# भगिनी निवेदिता यांचे जीवन व कार्य

**कु. अमृता भगवान पाटील**
बी. ए. भाग 3 - इतिहास
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**घोषवारा:**

मानवी इतिहासामध्ये स्त्रीची अवनती प्राचीन काळापासून विविध राजवटीमध्ये होत असल्याचे पहायला मिळते. ब्रिटीश काळात भारताला मुक्त करण्यासाठी अनेक स्त्रियांनी व स्त्री संघटनानी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. भारताला ब्रिटीशांच्या जोखडातून स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक व समाजसुधारकांनी महत्वाची कामगिरी बजावली. ज्यामध्ये अनेक विदेशी महिला व क्रांतिकारकांचा समावेश होता.

ज्यामध्ये अनि बेझंट, भगिनी निवेदिता अशा विदेसी स्त्रियांनी आपल्या कार्याची वेगळी छाप भारतीय स्वातंत्र्य लढ्यावर व इतिहासावर सोडली. त्यामुळे परदेशी क्रांतीची तत्वे, लढ्याचे मार्ग , तेथील परंपरा या सर्वांशी भारतीयांचा जवळून परिचय झाला. प्रस्तुत शोध निबंधातून अशाच एका थोर विदेशी स्वातंत्र्यसैनिकाबद्द्ल म्हणजेच भगिनी निवेदिता यांच्या जीवन व कार्याबद्दल माहितीचा अभ्यास केला जाणार आहे.

**कळीचे शब्द :** अवनती, राजवटी, बलिदान, स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक, समाजसुधारक...

**प्रस्तावना:**

जन्मत: परदेशी स्त्री असूनही ज्यांना भारतीय स्त्री अशी ओळख मिळाली व ज्या भारतीय जनतेच्या जीवनाशी व सुख दुःखाशी एकरुप झाल्या, ज्यांना स्वामी विवेकानंदांची कन्या म्हणून सन्मान मिळाला त्या भगिनी निवेदिता म्हणजेच मागरिट एलिझाबेथ नोबेल. त्यांचा जन्म 28 ऑक्टोंबर 1867 या दिवशी आयर्लंड येथे झाला. आई मेरी नोबेल आणि वडिल सम्युअल यांनी अशी इच्छा व्यक्त केली होती. जे बाळ जन्माला येईल ते ईश्वर चरणी त्यांचा सेवेसाठी अर्पण करीन, त्याचप्रमाणे पुढे जाऊन भगिनी निवेदिता यांनी आपले आयुष्य भारतीय समाजाच्या सेवेसाठी समर्पित केले. त्यांचे वडील व आजोबा धर्मोपदेशक होते. धर्म जिज्ञासू, सुशिल आईवडील आणि स्वांतत्र्य, देशसेवा, राष्ट्रप्रेम, तसेच स्वतंत्रसैनिक असणारे आजोबा अशा परिपूर्ण वातावरणात त्यांचे पालनपोषण झाले. चर्चतर्फे चालविण्यात येणाऱ्या हॅलिफॅकस महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. वडिल निवर्तल्यानंतर लंडनमध्ये त्यांनी शिक्षिकेचा व्यवसाय पतकरला.

**भगिनी निवेदिता यांचे अध्यात्मिक कार्य**

१८९५ मध्ये त्यांची विवेकानंदांशी भेट झाली विवेकानंदांच्या या भेटीने त्यांची संपूर्ण जीवनदृष्टीच बदलली. परिणामतः विवेकानंदांच्या आवाहनानुसार त्यांच्या कार्यास वाहून घेण्याकरिता त्या २८ जानेवारी १८९८ रोजी भारतात आल्या. परकीय म्हणून त्यांच्या कार्यात प्रथम पुष्कळ अडथळे आले परंतु विवेकानंदांनी विरोधकांची समजूत पटवून ते दूर केले. प्रथम शारदामाता (रामकृष्ण परमहसांची पत्नी) यांसारख्या महिलांकडून हिंदू धर्माचे अनेक संस्कार त्यांनी आत्मसात करून घेतले. कलकत्त्याच्या 'बोस पारा लेन' मध्ये कर्मठ लोकांच्या वस्तीत राहून आपल्या विनयशील, सालस व प्रेमळ वागणुकीने तेथील कर्मठ लोकांनाही आपलेसे करून घेतले. ११ मार्च १८९८ रोजी कलकत्त्याच्या स्टार रंगमंदिरात आयोजित केलेल्या सभेत धर्मशिक्षण व हिंदभूमीची सेवा करण्याचे आपले उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. २५ मार्च १८९८ रोजी त्यांना विधिपूर्वक ब्रहाचारिणीव्रताची दीक्षा स्वामी विवेकानंदानी दिली व त्यांचे नाव निवेदिता ठेवले. स्वामीजींबरोबर प्रवास केल्यामुळे हिंदू लोक व त्यांच्या चालीरीती, धर्मकल्पना आणि इतिहास यांची त्यांना जवळून कल्पना आली. १२ नोव्हेंबर १८९८ रोजी दिवाळीच्या दिवशी त्यांनी कलकत्त्यातील बागबाजार येथे एका बालिका विद्यालयाची स्थापना करून राष्ट्रीय शिक्षणकार्यास आरंभ केला. फेब्रुवारी १८९९

साली कलकत्त्यात उद्‌भवलेल्या प्लेगच्या साथीत त्यांनी सेवाकार्य केले. त्याच साली अमेरिकेत गेल्या व तेथे त्यांनी रामकृष्णसाहाय्य संस्था स्थापन केली. पॅरिस व लंडन येथील प्रवासानंतर १९०२ साली त्या भारतात परत आल्या. त्याच वर्षी विवेकानंदांचे निधन झाले व निवेदितांनी रामकृष्ण मंडळाबाहेर पडून राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनास वाहून घेतले. १९०२ ते १९०४ या काळात सर्व भारतात प्रचारदौराकरून लोकांत जागृती निर्माण केली. जुन्या व नव्या उपयुक्त आचारविचारांचा समन्वय करून स्वतंत्र, संघटित व समर्थ भारत बनविण्याचे विवेकानंदांचे ध्येय साकार करण्याकरिता त्यांनी जिद्दीने प्रयत्न केला. त्याकरिता त्यांनी देशप्रेमी, निस्वार्थी व त्यागी तरूणांची संघटना उभारली. त्या काळातील प्रमुख राजकीय पुढाऱ्यांशी व सशस्त्र क्रांतिवादी संघटनांशीही त्यांचा संबंध होता. १९०२ साली पुण्याला जाऊन हुतात्मे झालेल्या चाफेकर बंधूच्या मातेची पायधूळ डोक्यास लावली. १९०५ साली बनारसला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात भाग घेतला व स्वदेशी चळवळीला पाठिंबा देऊन स्वदेशीचे व्रत अंगीकारले. त्याच साली लॉर्ड कर्झनच्या बंगाल-फाळणीच्या योजनेला त्यांनी कडवा विरोध केला. जामिनाकरिता हवी असलेली रक्कम काही तासात जमा करून भूपेंद्र दत्त यास त्यांनी जामिनावर सोडविले. १९०६ साली पूर्व बंगालमध्ये दुष्काळाने व पुराने थैमान घातले असताना, त्यांनी अविश्रांत परिश्रम घेऊन लोकांना मदत केली. यूरोपात व अमेरिकेत असलेल्या भारतीयांना इंग्रज राजवटीविरूद्ध संघटित करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला.

**भगिनी निवेदितांचे कार्य**

स्वामी विवेकानंदांची लंडनमधील व्याख्याने ऐकून हिंदू तत्त्वज्ञान आणि भारतीय संस्कृती यांनी प्रभावित झालेल्या मार्गारेट नोबल भगिनी निवेदिता बनून कलकत्त्यात आल्या. त्याच दरम्यान कलकत्त्यात प्लेगच्या साथीने हलकल्लोळ माजवला होता. स्वामीजींच्या सूचनेप्रमाणे निवेदितांनी रुग्णांना औषधोपचार आणि रोगनिवारणासाठी लोकांमध्ये जाऊन प्रयत्न केले. बंगाली जनतेत मिसळून सामाजिक कार्यासाठी निवेदितांनी ज्या पद्धतीने स्वतला त्यात झोकून दिलं, ते पाहून निवेदिता, स्त्रियांच्या उत्कर्षासाठी काही तरी नक्कीच करू शकतील, असा विश्वास स्वामींना वाटला. स्वामींनी निवेदितांना स्त्री-शिक्षण प्रसाराचे कार्य सुरू करण्याचा सल्ला दिला.

स्वामींचा सल्ला मानून निवेदितांनी १८९८ साली कलकत्त्याच्या बगबझार या भागात महिलांसाठी बालिका विद्यालय सुरू केले. रामकृष्ण परमहंसांच्या पत्नी शारदामातांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या शाळेत लहान मुली, प्रौढा, नवविवाहिता, विधवा या सर्वांसाठी प्रवेश खुला होता. पुढे या शाळेचा चांगला विस्तार झाला. रवींद्रनाथ ठाकूर, अवनींद्रनाथ ठाकूर, ज्येष्ठ वनस्पतिशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बसू यांच्यासारख्या कलकत्त्यातील अनेक प्रतिष्ठित, विद्वान लोकांशी निवेदितांचा परिचय झाल्यावर त्यांच्याबरोबर निवेदितांची वैचारिक देवाणघेवाण होत असे. हिंदू धर्म निवेदितांनी अंतर्बाह्य स्वीकारला आणि हिंदू धर्म, कालीमाता या विषयांवर त्यांची अनेक व्याख्याने झाली. स्वामी विवेकानंदांचे निधन १९०२ मध्ये झाल्यावर निवेदितांनी राष्ट्रजागृती, भारतीय स्वातंत्र्य या विषयांवर पूर्ण बंगालमध्ये जहाल भाषणे दिली आणि पुस्तकेही लिहिली, स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार घरोघरी जाऊन केले.

**राष्ट्र आणि धर्म कार्य**

दीक्षा मिळाल्यानंतर भगिनी निवेदिता भारतातील जीवनपद्धत, भाषा आणि हिंदु धर्म यांच्याशी पूर्णतः एकरूप झाल्या. या सर्वांचा अभिमान बाळगत त्यांनी स्वदेशी वस्तूंची गाडीतून फिरून विक्री केली. स्वामीजींच्या महानिर्वाणानंतर त्यांनी 'उत्तिष्ठत जाग्रत…' हा संदेश आठवून त्यांचेच कार्य पूर्ण करण्यासाठी जोमाने स्वतःला राष्ट्रकार्यात झोकून दिले. स्वामीजींचा संदेश हिंदुस्थानभर सांगण्यासाठी त्यांनी दौरेही केले. साहित्य आणि कला क्षेत्रातही निवेदितांनी स्वतःचा ठसा उमटवला

**क्रांतीकार्य**

क्रांतीकार्यातही भगिनी निवेदिता तसूभरही मागे नव्हत्या. 'स्वातंत्र्य' ही भारताची पहिली आवश्यकता', असे निवेदिता म्हणत. क्रांतीकारकांना प्रेरित करणे, स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष सहभागी होण्यासाठी रामकृष्ण मठातून दूर होणे, लॉर्ड कर्झनला नामोहरम करण्याचे धारिष्ट्य आणि बुद्धीमत्ता दाखवणे, स्वामीजींचे धाकटे बंधू क्रांतीकारक भूपेंद्रनाथ यांच्या जहाल लेखामुळे

त्यांच्यावर भरलेल्या राजद्रोहाच्या खटल्यातून त्यांना जामिनावर सोडवण्यासाठी स्वतःचे काही सहस्र रुपये न्यायालयात भरणे, अशा अनेक कृतींतून त्यांचे क्रांतीकार्य स्पष्ट होते.

**निष्कर्ष:**

वरील मुद्यांचाआधारे आपल्या हे लक्षात येते भगिनी निवेदिता यांनी रामकृष्ण मिशनचा भारतात प्रसार केला. रामकृष्ण मठामार्फत विविध सामाजिक सुधारणा केल्या. भगिनी निवेदिता यांचा मृत्यु 13 ऑक्टोंबर 1911 रोजी दार्जीलिंग येथे झाला. भगिनी निवेदिता द मदर, हिंट्स ऑन नॅशनल एज्युकेशन इन इंडिया, वेब ऑफ द इंडियन लाईफ, रिलीजिएन अॅण्ड धर्मा, सिव्हिल अॅण्ड नॅशनल आइडियल्स इत्यादी. ग्रंथसंपदा लिहिले.

**संदर्भ ग्रंथ:**


1. खडपेकर विनया (१९९१), स्त्री स्वातंत्र्यवादिनी , विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
2. डॉ. बी. आर. बारड (२०१६), भारत के महान क्रांतिकारी, रावत प्रकाशन, दिल्ली.
3. गव्हाणे शुभांगी (२००३), स्त्री परिवर्तनाची आव्हाने, साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद .
4. गांधी नंदिता, शाह नंदिता (१९९४), स्त्री संघर्षाची नवी रूपे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
5. डॉ. काळदाते सुधा (1988), *भारतातील सामाजिक समस्या,* पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.